संक्षिप्त फौ.ख.क्र. १६/२०२६
सरकार .. वि.. कौंडु
निशाणी क्र. ५ खाली

MHWS090000342026

## न्या य नि र्ण य

(घोषित दिनांक १५ मे, २०२६)

प्रस्तुत प्रकरणात आरोपी यांचे विरुद्ध मुंबई दारु प्रतिबंधक कायद्याचे कलम ६५ (ई अन्वये दोषारोप ठेवले. सदरचा दोषारोप आरोपीला समजावुन सांगितला असता त्यांनी तो अमान्य केला व न्यायालयीन संपरिक्षेची मागणी केली.

२. अभियोग पक्षाचे कथन, अभिलेखावरील कागदोपत्री पुरावा व दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला असता खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होतात, त्यांच्या कारणासही निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| क्र. | मुद्दे | निष्कर्श |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि. १७/१२/२०२५ रोजी ग्राम-गोस्ता मानोरा ता.मानोरा, जि.वाशिम येथे आरोपी तिचे ताब्यात ०५ लिटर गा.हा.भ.दारु विनापरवाना बेकायदेशिररित्या बाळगतांना मिळून आली ? | ....नकारार्थी |
| २. | काय आदेश ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येते |

## – कारणमिमांसा –

### मुद्दा क्र.१ व २ करीता :

३. आरोपी विरुद्धचे आरोप सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने केवळ एक साक्षदार सा.क्र.१दिनेश दयाराम पवार (पंच) यांचा पुरावा सादर केला. सदरील साक्षदाराने घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यावरील सही मान्य केली. परंतु, कथित दारु पोलिसांनी आरोपीचे ताब्यातून जप्त करुन तसा घटनास्थळ जप्ती पंचनामा त्यांचे समक्ष तयार करण्याची बाब स्पष्टपणे नाकारली आहे. म्हणून त्यांच्या पुराव्यावर विश्वास करता येत नाही.

४. अभियोग पक्षाने इतर स्वतंत्र व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा पुरावा सादर केला

नाही. अभियोग पक्षास पुरेपुर संधी देवूनही त्यांनी रासायनिक विश्लेषन अहवाल सादर केला नाही. साक्षदारांच्या पुरक पुराव्या अभावी आणि रासायनिक विश्लेषन अहवाला अभावी जप्त करण्यात आलेले रसायन हे कथीत दारु होती आणि ते आरोपी जवळुन विनापरवाना मिळून आले याबाबत निष्कर्ष काढता येत नाही. म्हणून आरोपीने मुंबई दारु प्रतिबंधक कायद्याचे कलम ६५(ई) अन्वये दंडनिय अपराध केला आहे अशी मुंबई दारु प्रतिबंधक कायद्याचे कलम १०३ अन्वये धारणा करता येत नाही. करीता मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देण्यात येत आहे.

५. पुरेशा पुराव्या अभावी आरोपीला दोषी ठरविता येत नाही. म्हणून आरोपी निर्दोष मुक्त होणेस पात्र आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी नामे **कौंडु उदेभान मल्ले**, रा. ग्राम-गोस्ता ता. मानोरा, जि.वाशिम यांची मंबई दारु प्रतिबंधक कायद्याचे कलम ६५(ई) च्या आरोपातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७८ अन्वये गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल देशी दारु अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे राज्य उत्पादन शुल्क अधिकारी यांचेकडे विल्हेवाट लावणेकामी पाठविण्यात यावी.

४. आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ ची पुर्तता करण्याकरीता जमानत द्यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by TRUSHNA GOVINDRAO BANSOD
Date: 2026.05.15 19:04:57 +0530

बन्सोड)

दिनांक :१५/०५/२०२६

न्यायदंडाधिकारी (प्र.श्रे.), मानोरा
(न्यायालय क्र.२), मानोरा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | Smt. R. K. Chavhan<br>Stenographer (Grade-III) |
| Court | - | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Manora. |
| Date of Judgment/Order | - | 15/05/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 15/05/2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 15/05/2026 |